## कुवेतच्या भेटीपूर्वी पंतप्रधानांचे निर्गमन निवेदन

21 डिसेंबर 2024

आज, मी कुवेत राज्याचे अमीर, महामहिम शेख मेशल अल-अहमद अल-जाबेर अल-सबाह यांच्या निमंत्रणावरून कुवेतच्या दोन दिवसांच्या भेटीला सुरुवात करत आहे.

आमचे कुवेतशी असलेले ऐतिहासिक संबंध पिढ्यानपिढ्या जोपासले गेले आहेत. त्यांची आम्ही मनापासून कदर करतो. आम्ही केवळ मजबूत व्यापार आणि ऊर्जा भागीदार नाही, तर पश्चिम आशिया प्रदेशातील शांतता, सुरक्षा, स्थैर्य आणि समृद्धीमध्ये देखील आमचे सामायिक स्वारस्य आहे.

मी महामहिम अमीर, युवराज आणि कुवेतचे पंतप्रधान यांच्यासोबतच्या माझ्या भेटींसाठी उत्सुक आहे. आपल्या लोकांच्या आणि प्रदेशाच्या फायद्यासाठी भविष्यातील भागीदारीची योजना तयार करण्याची ही एक संधी असेल.

मी कुवेतस्थित भारतीयांना भेटण्यास उत्सुक आहे ज्यांनी दोन्ही राष्ट्रांमधील मैत्रीचे बंध दृढ करण्यात मोठा हातभार लावला आहे.

आखाती प्रदेशातील प्रमुख क्रीडा स्पर्धा असलेल्या अरेबियन गल्फ कपच्या उद्‌घाटन समारंभासाठी मला आमंत्रित केल्याबद्दल मी कुवेतच्या नेत्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करतो. ॲथलेटिक उत्कृष्टता आणि प्रादेशिक एकतेच्या या उत्सवाचा भाग होण्यासाठी मी उत्सुक आहे.

मला विश्वास आहे की या भेटीमुळे भारत आणि कुवेत यांच्यातील विशेष संबंध आणि मैत्रीचे बंध अधिक दृढ आणि बळकट होतील.

नवी दिल्ली

21 डिसेंबर 2024